# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.२३३३/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. संजय कारभारी कुटे,<br>रा. मु. पो. बेलतगव्हाण कुटे मळा,<br>ता.जि. नाशिक - ४२२४०१ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि. नाशिक | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती कार्यालय, नाशिक, ता.जि. नाशिक |

**सुनावणी दिनांक — २६/११/२०२५**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | उपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : दि.०२/०५/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती मिळाली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १६/०२/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १६/०२/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१६ ते आजपावेतो

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**

म. सरपंच मोहनिश वसंत दोंदे यांच्या अध्यक्षाखाली सरपंच झाल्यापासून तंटामुक्त समितीचे अध्यक्ष कोण आहे त्याची माहिती मिळावी व तसेच मोहनिशी वसंत दोंदे सरपंच झाल्यापासून किती समिती ग्रामसभेवर घेतलेल्या आहे त्या समित्यांची तयार केलेल्या व सरपंच झाल्यापासून किती ऑनलाईन ग्रामसभा घेतल्या त्या ग्रामसभेच्या प्रोसिडींगच्या नक्कला मिळाव्या वरीलप्रमाणे सत्य माहिती मिळावी. तसेच २०१६ पासून ते आजपर्यंज तंटामुक्त अध्यक्ष कोण आहे त्याची लेखी स्वरुपात माहिती मिळावी व तंटामुक्त अध्यक्ष यांची पोलीस व्हेरीफेकेशन झालेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मिळाव्या व त्या समितीवर कोण होते त्यांच यादी मिळावी वरीलप्रमाणे सत्य माहिती मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि. नाशिक यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १७/०३/२०२२

(२) प्रथम अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १७/०३/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती कार्यालय, नाशिक, ता.जि. नाशिक यांनी दि.०८/०४/२०२२ रोजी सुनावणी घेवुन त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथ ग्रामसेवक, बेलतगव्हाण यांनी ०७ दिवसाचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे आदेश पारित केल्याचे दिसून येते.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा –**

१) अपीलार्थी - माहिती अद्यापही मिळाली नसल्याचे सुनावणी दरम्यान सांगितले.
२) विद्यमान जन माहिती अधिकारी :- तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि. नाशिक यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**६. निष्कर्ष –**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि. नाशिक यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.
२) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती कार्यालय, नाशिक, ता.जि. नाशिक यांनी दि.०८/०४/२०२२ रोजी सुनावणी घेवुन प्रथम अपील आदेश पारित केल्याचे दिसून येते.
३) प्रथम अपील निर्णयानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि. नाशिक यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.
४) अपीलार्थी यांना अद्यापही माहिती अप्राप्त असल्याचे दिसून येते.
सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि. नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस त्यांच्या दिनांक १६/०२/२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहिती संदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपीलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन ५० पृष्ठांपर्यंतची माहिती १५ दिवसांत समक्ष / नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी. त्यापुढील माहितीचे पृष्ठे विहित शुल्क आकारुन अपीलार्थीस पुरवावीत. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर अपीलार्थी यांना १५ दिवसांत पाठवावे.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बेलतगव्हाण, ता.जि. नाशिक (श्री. राजेंद्र धुडकू महाले) यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा १५ दिवसांत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.
३. प्रस्तुत व्दितीय अपिल क्र.२३३३/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक.

जावक क्र. ५८५

दिनांक : 21 JAN 2026